


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २८१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२३ मे २०२५

## थोडक्यात

### फळे पिकविण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडच्या वापरावर बंदी



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२२, ठाणे :** भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अवैधपणे फळांवर कृत्रिम रंगांचा वापर रोखण्यासाठी तपासणी आणि विशेष मोहीम राबवण्याचे आवाहन केले आहे. यासह फळांच्या कृत्रिम पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाइडच्या वापरावर बंदी आणून ग्राहकांच्या आरोग्याचे होणारे नुकसान थांबवून सकारात्मक पाऊल उचलले आहे. सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेशांच्या अन्न सुरक्षा आयुक्त आणि 'एफएसएसएआय' च्या प्रादेशिक संचालकांना फळांच्या बाजारपेठा आणि मंडईंवर कडक लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहे, जेणेकरून कॅल्शियम कार्बाइडसारख्या (ज्याला सामान्यतः 'मसाला' म्हणतात) पिकवणाऱ्या एजंट्सचा अवैध वापर रोखता येईल.

या मोहिमेचा भाग म्हणून, ज्या ठिकाणी फळांची साठवणूक केली जाते तिथे जर कॅल्शियम कार्बाइडचा वापर आढळला तर त्याला परिस्थितीजन्य पुरावा मानून अन्न व्यवसाय ऑपरेटर (एफबीओ) वर खाद्य सुरक्षा आणि मानके (एफएसएस) कायदा, २००६ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

फळांच्या कृत्रिम पिकवणीसाठी कॅल्शियम कार्बाइडचा वापर खाद्य सुरक्षा आणि मानके (विक्रीवरील प्रतिबंध आणि निर्बंध) नियम २०११ अंतर्गत कडकपणे प्रतिबंधित आहे. या पदार्थाचा वापर गंभीर आरोग्य धोके निर्माण करतो आणि यामुळे तोंडाला जखम, पोटात जळजळ आणि कर्करोगजन्य गुणधर्म निर्माण होऊ शकतात.

याशिवाय, एफएसएसएआयने असेही निर्देश दिले आहेत की, ज्या एफबीओज् कृत्रिम रित्या केळी पिकवताना रसायनांचा वापर करतात, त्यांच्यावरही कारवाई केली जावी. यासंदर्भात, प्राधिकरणाने एक सर्वसमावेशक मार्गदर्शन सूचना जारी केल्या आहेत, त्या ु. षीीरळ.सीीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

यात फळांना कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी इथिलीन गॅसचा वापर कसा करावा याबाबत मानक संचालन प्रक्रिया (एसओपी) स्पष्टपणे नमूद केली आहे. इथिलीन गॅस वापरण्याच्या सर्व पैलूंचा समावेश आहे, एफएसएसएआय ने सर्व अन्न व्यवसाय ऑपरेटरांना या एसओपींचे पालन करण्याचे आणि सुरक्षित पिकवण पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे.

### मंगल कार्यालयासमोर रस्ता ओलांडताना भरधाव टिप्परने उडविले...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, बुलढाणा :** सध्या सर्वत्र लग्नसराईचा धुमधडाका सुरू आहे यामध्ये विशेष करून प्रत्येक जण उन्हाळ्याची सुट्टी असल्याने लग्न समारंभात वेळेवर पोहोचण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र जेव्हा लग्न मंडपाच्या समोरच दुर्दैवी घटना घडते तेव्हा तिथे निर्माण झालेलं अपघाती चित्र बघवत नाही. किंबहुना असे काही घडेल याची आपण कल्पना देखील करू शकत नाही. लग्नासाठी गेलेल्या अंदाजे ४२ वर्षीय इसमाला मंगल कार्यालयासमोर रस्ता ओलांडताना भरधाव टिप्परने उडविले. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. हा भीषण अपघात देऊळगावराजा येथे २१ मे रोजी दुपारच्या सुमारास घडला.

देऊळगाव राजा तालुक्यातील चिखली रोडवरील दगडवाडी फाट्याजवळ पंकज लॉन्स समोर ही दुर्दैवी घटना घडली. बिना नंबर प्लेट वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने राहुल गवई अंदाजे वय ४२ वर्ष हे झीने कुटुंबाच्या विवाहसमारंभात उपस्थित राहण्यासाठी पोहोचत होते. लग्न समारंभाची घटीका जवळ आली होती आणि त्यावेळेस राहुल गवई हे रस्ता ओलांडत असताना अवैध वाळूच्या टिप्परने त्यांना चिरडले. यामध्ये ते जागीच मृत्युमुखी पडले. आणि अक्षरशः क्षणात होत्याचे नव्हते झाले. आपल्या पोटाची खळगी भरण्याकरिता मयत राहुल गवई हे साखरखेर्डा येथे गावात दारोदारी फिरत सकाळी वर्तमानपत्र एजन्सी चालवतात. व त्यावरच त्यांच्या कुटुंबाचा भार होता. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, पत्नी, आई-वडील असा परिवार आहे.

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परने नागरिकांना चिडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. या अवैध वाहतुकीला विरोध केल्यास वाळू माफीया हल्ला करण्यास मागेपुढे पाहत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. आणि या सर्व बाबींकडे प्रशासन डोळे बंद करून मूग गिळून गप्प आहे. विना नंबर वाळू टिप्पर धडक देऊन निघून गेलेल्या चालकाचा अद्याप पत्ता लागलेला नाही. मयत राहुल गवई यांस देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र शवविच्छेदन करता येईल अशी अवस्था राहुल गवई यांची राहिली नाही. यावरून किती भयावक आणि दुर्दैवी हा अपघात असेल याची कल्पना न केलेलीच बरी.

### बेदम मारहाण करून गळा दाबून पत्नीचा खून

**दि.२२, छत्रपती संभाजीनगर :** तुला हा नवीन मोबाईल कोणी दिला? पत्नीने काही एक उत्तर न दिल्याने रागाच्या भरात पतीने तो मोबाईल चुलीत फेकून दिला. यावरून पती-पत्नीमध्ये कडाक्याचं भांडण झालं. त्यानंतर काठीने बेदम मारहाण करून गळा दाबून पत्नीचा खून पतीने केला. हेच नाही तर पत्नीचा खून करून आरोपी घरातच झोपी गेला. ही घटना कन्नड तालुक्यातील मोहिंद्रा शिवारात बुधवार २१ रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंकाबाई संजय देवळे (वय २७) रा.बोरगाव मध्यप्रदेश असे मयत महिलेचे नाव आहे. संजय देवळे असे आरोपी पतीचे नाव आहे.

## महाराष्ट्रातील तब्बल २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** महाराष्ट्रात गृह विभागाकडून सध्या बदल्यांचा धडाका सुरु आहे. नुकतंच काही दिवसांपूर्वी गृह विभागाने १७ मे रोजी २७ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश जारी केला होता. त्यानंतर लगेच पाच दिवसांनी आज पुन्हा एकदा तब्बल २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची घोषणा करण्यात आली आहे. या घोषनेनंतर राज्यातील तब्बल १३ जिल्ह्यांना नवे पोलीस अधीक्षक मिळाले आहेत. विशेष म्हणजे शासनाकडून काल खअड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. यानंतर आज खझड अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षकांसह रायगड, कोल्हापूर, अकोला, नागपूर, पालघर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**कोणकोणत्या अधिकाऱ्यांच्या बदल्या?**

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची मुंबईच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य राखीव पोलीस बल, पुणे येथील समादेशक आंचल दलाल यांची रायगड पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित यांची ठाणे शहर पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नांदेड नागरी सुरक्षाचे पोलीस अधीक्षक योगेश



गुप्ता यांची कोल्हापूरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

अकोलाचे पोलीस अधीक्षक बच्चन सिंग यांची राज्य राखीव पोलीस बल गट क्रं. ४ नागपूरच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नागपूर शहर पोलीस उपायुक्त अर्चित चांडक यांची अकोला पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई आर्थिक गुन्हे शाखेचे मंगेश शिंदे यांची नागपूरच्या लोहमार्ग पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबईचे सहायक पोलीस महासंचालक राजातिलक रोशन यांची मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांची नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गडचिरोलीचे अप्पर पोलीस अधीक्षक यतिन देशमुख यांची पालघर पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सिंधुदुर्गचे पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांची पुणे गुन्हे अन्वेषण विभाग येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

ठाण्याचे पोलीस उपायुक्त मोहन दहिकर यांची सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बुलढाणाचे पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची राज्य राखील पोलीस दल अमरावती येथे समादेशक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

नागपूर गुन्हे अन्वेषणचे निलेश तांबे यांची बुलढाणा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

साताऱ्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांची मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे लोहमार्ग पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांची सातारा पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आगे.

लातूर पोलीस अधीक्षक सोमया मुंडे यांची संभाजीनगर परिमंडळ १ च्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे दहशतवादविरोधी पथकाचे पोलीस अधीक्षक जयंत मीणा यांची लातूर पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

संभाजीनगरचे उपायुक्त नितीन बगाटे यांची रत्नागिरी पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सांगलीचे अप्पर पोलीस अधीक्षक रितू खोकर यांची धाराशिव पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## 'ऑपरेशन सिंदुर' च्या विजयाच्या गगनभेदी घोषणांनी धाराशिव दणाणले

### - भव्यदिव्य तिरंगा रॅलीने जागवला देशाभिमान...

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२२, धाराशिव :** पहलगाम येथे आतंकवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्लयात भारतीय पर्यटक मृत्युमुखी पडले. याचा भारतीय सैन्य दलाने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून बदला घेत पाकिस्तानला त्यांची औकात दाखवली. भारतीय सैन्याच्या या शूर पराक्रमाचा धाराशिव शहरात गुरुवारी भव्यदिव्य तिरंगा रॅली काढून गौरव करण्यात आला. भारत मातेचा आणि भारतीय सैन्य दलाने केलेल्या कामगिरीचा जयघोष करीत या रॅलीने तमाम धाराशिवकरानी भारतवासीयामध्ये देशाभिमानाची ज्योत पेटवली.

शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे, पालकमंत्री ना. प्रतापराव सरनाईक यांच्या आदेशाने शिवसेनेतर्फे ही भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली होती. शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, जिल्हा संघटक सुधीर पाटील, जिल्हाप्रमुख मोहन पनूरे यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ चौक येथून करण्यात आली. श्रीपतराव भोसले हायस्कूल, आरपी कॉलेज, छत्रपती संभाजी महाराज चौक, संत गाडगेबाबा महाराज चौक,




डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही रॅली विसर्जित करण्यात आली.

या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या भारतीय जवानांच्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. नागरिकांच्या हातात असलेले तिरंगा ध्वज, देशभक्तीपर गाणी, वारकरी गीत यामुळे अवघे शहर दणाणून गेले.

या रॅलीमध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महिला, शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, देशाभिमानी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे चांदा फोर्ट रेल्वे स्थानकाचे उद्घाटन...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** चांदाफोर्ट स्थानकाचा झालेला कायापालट हा केवळ भौतिक स्वरूपातील बदल नाही, तर तो पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे मूर्तस्वरूप आहे. त्यांच्या संकल्पशक्तीमुळे आणि केंद्र शासनाच्या सहकार्यामुळेच आज चंद्रपूरकरांना स्वच्छ, सुसज्ज आणि आधुनिक रेल्वे स्थानक अनुभवता येत आहे.

चांदाफोर्ट स्थानकाचा ऐतिहासिक कायापालट हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीचा परिणाम आहे. असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत चांदाफोर्ट रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास करण्यात आला आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या रेल्वे स्थानकाचे उद्घाटन संपन्न झाले. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी खासदार प्रतिभा धानोरकर, स्वातंत्र्यसैनिक डॉ. शेषरावजी इंगोले, मुख्य अभियंता बी.व्ही.एस. सुब्रमण्यम, दामोदर मंत्री, पूनम तिवारी, प्रकाश देवतळे, सुभाष कासनगोट्टुवार, विठ्ठल डुकरे,




रवी गुरनुले, देवानंद वाढई, मधुसूदन रुंगठा, प्रदीत किरमे, वंदना हातगावकर, मधुकर राहूत, सुदामा यादव, विश्वजित शाहा, नकुल वासमवार, विनोद अनंतवार, कार्तिक बोरेवार, राहुल मोहुर्ले, शेखर शेट्टी, सलीम शेख आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वात अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत देशातील १०३ नव्याने पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचे लोकार्पण झाले, ही आपल्या सर्वांसाठी गौरवाची बाब आहे. चांदाफोर्ट स्थानकाचे या यादीत समावेश होणे हे आपल्यासाठी विशेष महत्त्वाचे आहे. चांदा फोर्ट स्थानक हे केवळ एक स्थानक नसून, हे या परिसराचा सर्वांगीण विकासाचे प्रवेशद्वार ठरेल. या स्थानकामुळे स्थानिक नागरिकांना आधुनिक, स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज सेवा मिळतील. आता हे स्थानक अधिक सुरक्षित आणि सुसज्ज सुविधांनी युक्त असेल. स्थानकातील प्रवाशांसाठी नवीन सुविधा, व्हीलचेअर ॲक्सेस, सुसज्ज प्रतीक्षा कक्ष, डिजिटल सिस्टीम्स, एलईडी डिस्प्ले, आधुनिक तिकीट व्यवस्था, स्वच्छतागृहे, आणि व्यावसायिक गरजांसाठी सुलभ मालवाहतूक व्यवस्थापन या सर्व सुविधा मिळणार आहेत. केंद्र शासनाच्या सहकार्याने, रेल्वे मंत्रालयाच्या माध्यमातून हे शक्य झाले. स्थानकासह रस्ते, वीज, पाणी, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी अधिकाधिक योजना राबवण्याचा आमचा प्रयत्न राहील. तसेच या परिसरातील रस्ते, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण, आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय



### दहशतवाद वैश्विक समस्या

भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ मध्ये तामिळनाडू मधील श्रीपेराम्बदूर येथे एल टी टी ई ( लिट्टे ) च्या दहशतवाद्यांनी एका प्रचारसभेत बॉम्बस्फोट करून हत्या केली. राजीव गांधी यांच्या हत्येने संपूर्ण देश हादरुन गेला. १९८४ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली त्यानंतर भारताला बसलेला हा दुसरा हादरा होता. हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर होता. या हल्ल्याने भारतच नव्हे तर संपूर्ण विश्वच दहशतवाद्यांच्या दहशतीखाली आले. २१ मे १९९१ पासून सुरू झालेला दहशतवाद्यांचा हा धुमाकूळ आजही जगभरात सुरू आहे म्हणूनच २१ मे हा राजीव गांधी यांचा स्मृतिदिन संपूर्ण जगात दहशतवादी विरोधी दिन म्हणून पाळण्यात येतो. सद्य स्थितीत जगभरात वेगवेगळ्या प्रकारचा दहशतवाद पसरला आहे. दहशतवादाने संपूर्ण जग व्यापले आहे. जगातील एकही देश आज दहशतवादापासून मुक्त नाही. दहशतवाद आज सर्व देशांचे दार ठोठावीत आहे. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेला देखील दहशतवादाचा तडाखा बसला आहे. दहशतवादी हा शब्द उच्चारायला जरी वेगळा वाटत असला तरी याचे नेतृत्व करणारे लोक हे अशिक्षित नसून उच्चशिक्षित असतात. देव व धर्माच्या नावाखाली तरुणांचे ब्रेन वाशिंग करुन हे लोक श्ध्येच्या नावाखाली जगभरात दहशतवाद पसरवीत आहेत. दहशतवाद म्हणजे लोकशाहीच्या विरोधातील बाजू त्यामुळे दहशतवाद हा लोकशाही शासनव्यसवस्थेत अडथळे निर्माण करतो. सामाजिक असंतुलन हे दहशतवादाचे मूळ आहे. सत्तेची हाव, अधिकार नाकारणे, स्वतः च्या फायद्यासाठी दुसऱ्याला ओलीस धरणे, धर्मसत्ता लादणे, जाती भिन्नता, धर्मभेद तसेच समाजातील भिन्न संस्कृतीचे लोक एकमेकांबरोबर आणि एकाच राजकीय छत्राखाली व एकाच न्यायव्यवस्थेखाली राहायला नाखूष असतात. बरेचदा राज्यकर्त्यांचे एखाद्या भागाकडे दुर्लक्ष होते व त्या भागाची प्रगती खुंटते त्यामुळे एकाच देशात आर्थिक भेदभाव निर्माण हातात आणि त्यातून आतंकवादाचा जन्म होतो. आपण सर्वांनी जागरूक होणे आवश्यक आहे. दहशतवाद हा मानवजातीचा शत्रू आहे. यामुळे संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून प्रतिकारासाठी सज्ज असले पाहिजे. जागतिक दहशतवादाचा सगळ्यात मोठा हादरा भारताला बसला आहे, त्यामुळे दहशतवाद नष्ट करणे ही देशातील प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारताला बसली आहे. दहशतवादाने भारताला दोन कर्तव्यदक्ष पंतप्रधानांना गमवावे लागले आहे. अगदी सर्वसामान्य नागरिकांपासून पंतप्रधानांपर्यंत सर्वांनाच दहशतवाद्यांनी लक्ष केले आहे. गेल्या पन्नास वर्षापासून भारत दहशतवादाचा झळा सोसतोय त्यात देशातील लाखो निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे आजही जात आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ निष्पाप नागरिकांना ठार केले त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात संतापाची लाट उसळली. भारताने ऑपरेशन सिन्दुर राबवून त्याचा बदला घेतला मात्र तरीही दहशतवादी त्यातून धडा घेतील असे वाटत नाही. ते दहशतवाद पसरवतच राहतील. दहशतवाद संपवण्याची जबाबदारी केवळ सरकारची, सुरक्षा यंत्रणेची किंवा लष्कराची नाही तर देशातील प्रत्येक नागरिकांची आहे. देशातील नागरिकांनीही नेहमी सजग राहून दहशतवादाचा म ुकाबला करायला हवा. आपल्या आसपास कोठेही काही संशयास्पद आढळले तर नागरिकांची त्यांची माहिती सुरक्षा यंत्रणांना द्यावी. सुरक्षा यंत्रणेइतकेच नागरिकांनीही सजग राहून दहशतवादाचा मुकाबला करायला हवा. दहशतवादाची झळ जशी भारताला बसली आहे तशीच ती जगालाही बसली आहे. दहशतवादाने केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जग पोळले आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, जपान, दक्षिण कोरिया, रशिया, इस्राईल, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका या जगातील बलाढ्य देशांनाही दहशतवाद्यांनी तडाखा दिला आहे. केवळ बलाढ्य देशच नव्हे तर जगातील सर्वच लहान मोठ्या देशांना दहशतवादाची झळ बसत आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करणे ही कोणा एका देशाची नाही तर जगातील सर्व देशांची जबाबदारी आहे. दहशतवादाची समस्या ही वैश्विक आहे म्हणून दहशतवादाशी लढायचे असेल तर संपूर्ण जगाला एक व्हावेच लागेल त्यासाठी अमेरिका, रशिया सारख्या महासत्ता असलेल्या देशांनी दुटप्पी भूमिका न घेता दहशतवादा विरुद्ध युद्ध पुकारावे. दहशतवादी हे मानवतेचे शत्रू आहे. त्यामुळे संपूर्ण जगानेच एक होऊन या मानवतेच्या शत्रूंचा मुकाबला करायला हवा.

# वळीवाचा पाऊस : लाभदायक की नुकसानकारक?



मान्सून दाखल होण्यापूर्वी येणाऱ्या पावसाला आपण वळीव पाऊस म्हणून ओळखतो. वळीव पाऊस राज्यनिहाय वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रात त्याला आम्रसरी किंवा वळवाचा पाऊस म्हणतात. हा पाऊस आंबा पिकास मानवतो म्हणून त्याला आंबेसरी असेही म्हणतात.मेच्या शेवटी व जूनच्या प्रारंभी केरळ व कर्नाटक राज्यांत वादळी वाऱ्यासह पडणाऱ्या या पावसाला चेरी ब्लॉसम पाऊस म्हणतात. पश्चिम बंगालमध्ये या पावसास नॉर्वेस्टर असे म्हणतात. हा पाऊस कॉफी पिकासाठी उपयुक्त असल्याने त्यास कॉफी बहार सरी असेही म्हणतात. उत्तर प्रदेशमध्ये आँधी या नावाने हा पाऊस ओळखला जातो.

सध्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वळीव पाऊस आपले रौद्ररूप दाखवत आहे. काही बाबतीत हा पाऊस नुकसानकारक ठरतो. मोठ्या वादळ वाऱ्यासह येणाऱ्या या पावसामुळे झाडे उन्मळून पडतात, विजेचे खांब कोसळतात आणि विजेचा लपंडाव सुरू होतो. घरावरील पत्रे उडून जातात आणि अनेकांचे संसार उघड्यावर पडतात.

अचानक वीज कोसळल्यामुळे जीवितहानी झाल्याच्या घटनाही घडतात. शेतात काम करणाऱ्या एखाद्या शेतकऱ्याचा अथवा जनावर राखणाऱ्या गुराख्याचा वीज कोसळून मृत्यू झाल्याच्या घटना हळहळ वाटणाऱ्या ठरतात. एका सर्वेक्षणानुसार दरवर्षी वीज कोसळून सुमारे २५०० लोकांचा मृत्यू होतो.

विजांचा कडकडाट होत असेल तर काय केले पाहिजे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शिका प्रसिद्ध केल्या जातात. या मार्गदर्शिकेनुसार:

घरात असाल तर दरवाजे व खिडक्यांपासून दूर राहा.

पाण्याशी संबंधित कोणतेही काम करू नका.

इलेक्ट्रिक उपकरणांचा वापर करू नका.

हातात छत्री असेल तर ती बंद करा.

मोकळ्या मैदानात झाडांपासून दूर उभे राहा.

शेतात काम करत असाल आणि सुरक्षित ठिकाणी आसरा घेण्यासाठी वेळ नसेल, तर दोन्ही पाय गुडघ्याजवळ घेऊन खाली बसा आणि कानांवर हात ठेवा. विजा चमकत असताना तुम्हाला विद्युत प्रभार जाणवला, अंगावरील केस उभे राहिले, त्वचेला मुंग्या किंवा झिणझिण्या आल्या, तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता असते. अशावेळी त्वरित जमिनीवर आडवे व्हा किंवा गुडघ्यात मान घालून बसा. धरणे, तलाव अशा पाण्याच्या ठिकाणांपासून लांब राहा. जवळ एखादी लोखंडाची किंवा तांब्याची वस्तू असेल, तर ती दूर ठेवा. पाऊस व वीज होत असताना बाहेर असाल आणि एखादी इमारत जवळ नसेल, तर झाडाखाली उभे राहू नका, कारण मोठी झाडे वीजेला आकर्षित करतात.

असं असलं तरी उन्हाच्या कहराने हैराण झालेल्या जीवांना या पावसाने दिलासा मिळतो. ढगाळ वातावरणात तुफान पाऊस होत असल्यामुळे सर्वांना पावसाळ्याची अनुभूती मिळू लागते. हवेत गारवा निर्माण झाल्याने प्रचंड उष्णतेने त्रासलेले लोक सुखावतात. खरीपपूर्व मशागतीसाठी हा पाऊस पोषक असल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होते.

पावसाळ्यापूर्वीची संपूर्ण नालेसफाई पूर्ण झाली नसल्यामुळे काही ठिकाणी पाणी तुंबून वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. रोहिणी नक्षत्र २५ मेपासून सुरू होणार असतानाच वळीव पावसाची जोरदार सुरुवात झाल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे. मात्र, मशागतीची काही कामे या पावसामुळे खोळंबली गेली आहेत. मागील दोन दिवसांपासून सलग पावसामुळे हवेतील उष्णता कमी झाली आहे.वैशाख वणवा यंदा असह्य झाला होता. साधारणतः कमाल तापमान सर्वत्र ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. वळीव पावसामुळे आता ते ३०–३२ अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे.

काहींना सुसह्य, तर काहींना असह्य वाटणाऱ्या वळीव पावसासारख्या घडामोडी निसर्गात मोठ्या प्रमाणात होत असतात. मानवाने निसर्गावर कुरघोडी करण्यास सुरुवात केल्यामुळे त्याचा प्रकोप देखील अनुभवास येतो. निसर्गाशी सुसंगत होऊन विकास साधणे हेच मानवाचे लक्ष्य असले पाहिजे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# जागतिक कासव दिन !

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे.

कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उद्देश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## जीवन जगावे चांगले

जगतात लोक जीवन कसेही
वागतात मनात आले तसेही
बोलतात शब्द न पारखता
व्यवहार वचनाला न जागता

जगतात लोक जीवन कसेही
करतात कामे मनात आले तसेही
चालतात जीवनवाट मनमानी
घालतात वाया वेळ अन् पाणी

जगतात लोक जीवन कसेही
चांगल्या लोकांची साथ असुनही
वाईट कर्म त्यांच्या ठायी
करतात खर्च पैसा अनाठायी

जगतात लोक जीवन कसेही
ठेवतात नावे चांगल्या लोकांनाही
हसतात कुत्सितपणे इतरांना
रडतात घाबरून संकटांना

जगतात लोक जीवन कसेही
असते माहीत त्यांना तरीही
सोडेनात हेका वाईट वागण्याचा
फायदा काय असल्या जगण्याचा

जीवन मिळालेले जगावे चांगले
चारित्र्य शुद्ध ते असावे आपले
जगणे आपले बावनकशी सोने
इतरांनाही वाटते ते हवेहवेसे

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट,ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.**

# सावरगाव येथील महिलांसाठी एकविरा देवी दर्शन यात्रा उत्सव

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि,२३ सुपा (अहिल्यानगर) :** नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्या विचार प्रेरणेतून आणि शिवाजी बेलकर मित्र मंडळ यांच्या संकल्पनेतून सावरगाव येथील सर्व वाड्या आणि वस्त्यांवरील महिलांसाठी मोफत एकविरा देवी दर्शन यात्रा उत्सव गुरुवार, २२ मे २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष आणि सावरगावचे ग्रामपंचायत सदस्य रवींद्र गायखे तसेच एकता कन्ट्रक्शनचे संचालक आणि उद्योजक संतोष गायखे यांच्या विशेष प्रयत्नांनी करण्यात आले. या यात्रेत सावरगाव येथील ५०० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवला आणि एकविरा देवीचे दर्शन घेतले.

या उपक्रमांतर्गत महिलांसाठी सुसज्ज आणि आरामदायी बसची व्यवस्था करण्यात आली होती. सकाळी न्याहारी, दुपारी जेवण, शुद्ध पिण्याचे पाणी आणि प्रथमोपचार यासारख्या सर्व सुविधा महिलांना मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व व्यवस्था एकविरा देवीच्या महिला भक्तांना सुखद आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव देतील याची विशेष काळजी घेण्यात आली होती. सावरगाव येथून जिल्हा परिषदेच्या म ाजी सदस्या राणीताई लंके यांच्या हस्ते नारळ वाढवून या यात्रेच्या बसेस एकविरा देवीच्या दिशेने रवाना झाल्या. यावेळी माजी सभापती गंगाराम बेलकर, शिवाजी बेलकर, संतोष गायखे, रवींद्र गायखे, गणेश गायखे, नारायण गायखे, नवनाथ राळे, अक्षय कळमकर, अश्विन




गायखे, गणेश भोसले, दत्ता भोसले, राजेंद्र जगताप सर, अनिकेत गायखे, शशी आंधळे, रामभाऊ थोरात, रणधीर शिंदे, जिजाभाऊ चिकने, साहेबराव चिकने, दादाभाऊ चिकणे, हरिभाऊ साळवे, रामदास साळवे, अक्षय माने, बाळशिराम गायखे, दत्तात्रय भोसले, नारायण गायके, गणेश भोसले, अक्षय कळमकर, अनिकेत गायखे, संतोष शिंदे बाळासाहेब शिरतार, विठ्ठल माने, बाबाजी भोसले, भाऊ चिकणे, गंगाराम चिकणे, शिवाजी भोसले, लहु गायखे, रामदास मगर यांच्यासह सावरगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमाचे खासदार निलेश लंके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके, दीपक लंके, पारनेर पंचायत समितीचे माजी सभापती गंगाराम बेलकर आणि बाजार समितीचे माजी संचालक शिवाजी बेलकर यांनी विशेष कौतुक केले. या उपक्रमामुळे गावातील महिलांना एकविरा देवीचे दर्शन घेण्याची संधी मिळालीच, शिवाय सामाजिक एकता आणि बंधुभाव वाढवण्यासही हातभार लागला. खासदार निलेश लंके यांनी या उपक्रम ाचे आयोजन करणाऱ्या सर्वांचे आभार मानले आणि असे सामाजिक उपक्रम भविष्यातही राबवले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या यात्रेत सहभागी झालेल्या महिलांनी आयोजकांचे मनापासून आभार मानले. त्यांनी सांगितले की, अशा उपक्रमांमुळे त्यांना धार्मिक स्थळांचे दर्शन घेण्याची संधी मिळाली आणि गावातील सामाजिक वातावरणही अधिक सकारात्मक झाले.

रवींद्र गायखे आणि संतोष गायखे यांनी सांगितले की, हा उपक्रम गावातील महिलांना एकत्र आणण्याचा आणि त्यांच्या श्रद्धेला सन्मान देण्याचा एक छोटासा प्रयास आहे. भविष्यातही असे उपक्रम आयोजित करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा त्यांचा मानस आहे.हा उपक्रम सावरगाव गावातील सामाजिक आणि धार्मिक कार्यात एक नवीन पायंडा रचणारा ठरला असून, यामुळे गावातील महिलांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डॉ. अभिजीत कदम यांना जागतिक स्तरावर Scholar GPS ने टॉप ०.५% शास्त्रज्ञांमध्ये दिली मान्यता



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.२१, हदगाव (नांदेड) :** शिक्षण, संशोधन आणि वैज्ञानिक क्षेत्रातील उत्कृष्ठतेची मान्यता म्हणून डॉ.अभिजीत कदम यांची निवड Scholar GPS या आंतरराष्ट्रीय विश्लेषण संस्थेने जगभरातील टॉप ०.५% शास्त्रज्ञांमध्ये केली आहे.

ही सन्माननीय ओळख ही डॉ. कदम यांच्या त्यांच्या क्षेत्रातील दीर्घकाळच्या संशोधन, दर्जेदार लेखन आणि आंतरराष्ट्रीय प्रभावाच्या परिणामांची जाणीव करून देते.

Scholar GPS एक वैज्ञानिक मूल्यांकन प्रणाली Scholar GPS ही संस्था कृत्रिम बुद्धिमत्ता **(AI)** व डेटा सायन्स वापरून जगभरातील लाखो संशोधकांचे मूल्यांकन करते. यामध्ये संशोधनाची गुणवत्ता, प्रकाशनांची संख्या, संदर्भ (citations), आणि विशिष्ट विषयांवरील योगदान या निकषांवर शास्त्रज्ञांचे स्थान निश्चित केले जाते.

या संस्थेच्या मते, डॉ. अभिजीत कदम यांनी त्यांच्या संशोधनातून जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, ते ०.५% टॉप स्कॉलर्सच्या यादीत स्थान मिळवणारे थोड्याच भारतीयांपैकी एक आहेत.

संशोधनात सातत्य आणि गुणवत्ता डॉ.कदम यांनी LEDs मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने संशोधन केले आहे. त्यांच्या कार्याचा परिणाम केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरता मर्यादित न राहता, तो समाज आणि उद्योगजगतातही जाणवला आहे.

या यशाबद्दल बोलताना डॉ. कदम म्हणाले, ही ओळख मला अधिक प्रेरणा देते. हे यश केवळ माझे नाही, तर माझ्या मार्गदर्शक, सहकारी आणि संस्थेचेही आहे. Scholar GPS बद्दल थोडक्यात:

Scholar GPS ही संस्था जगभरातील ५०,००० हून अधिक विद्यापीठे व संस्थांतील ३० दशलक्षहून अधिक संशोधकांचे डेटावर आधारित विश्लेषण करते. १४ प्रमुख क्षेत्रे, १७७ विषय आणि ३.५ लाख विशेष शाखांमध्ये संशोधकांचे स्थान निश्चित करते. डॉ. अभिजीत कदम यांचे हे यश केवळ त्यांच्यासाठी नव्हे, तर भारतासाठीही अभिमानास्पद असून, ते नव्या पिढीच्या संशोधकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

## मिरा भाईंदर काँग्रेस(आय) जिल्हा तर्फे तिरंगा रॅली



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२१, मिरा भाईंदर :** दिनांक २१ रोजी मिरा भाईंदर काँग्रेस तर्फे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन केले होते. रॅली सिल्वर पार्क ते मिरा रोड वीर स्मृती कॅप्टन कौतुभ राणे स्मारक जवळ काढण्यात आली. रॅलीचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष प्रमोद राणे व जिल्हा उपाध्यक्ष आफरीन सैय्यद व युवा अध्यक्ष सिद्धेश राणे व काँग्रेसचे मा. नगरसेवक व मोठया प्रमाणात कार्यकर्ते जमा झाले होते. देश भक्ती चे स्लोगन देत रॅली पार पडली. रॅलीत काँग्रेस चे कार्यकर्ते जोश मध्ये दिसत होते. देशच्या सैनाचे 'जय जवान जय किसान' घोषणा देत होते. त्या बरोबर बहुतेक कार्यकर्त्यांनी सेना अधिकारी कर्नल सोफिया कुरेसी, विंग कमांडर व्योमिका सिंग ह्याचे फोटो हाती घेऊन चालत होते. रॅली मार्फत त्यांचा सन्मान करीत होते.

## पापनाश मंदिरात भाजपचा स्वच्छतेचा संकल्प



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२१, धाराशिव :** राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या आजोळ असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या आणि अहिल्यादेवींनी स्वतः स्थापन केलेल्या श्री पापनाश मंदिर परिसरात भाजपच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, ॲड. नितीन भोसले, खंडेराव चौरे, विकास बारकुल, इंद्रजित देवकते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, डॉ. गोविंद कोकाटे, मदन बारकुल, दत्तात्रय सोनटक्के, मकरंद पाटील, शिवाजी गिद्दे, खंडेराव मैंदड, सोमनाथ बारकुल हे भाजपचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी यावेळी सांगितले की, अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ मंदिर बांधणीच नव्हे तर समाजकारणातही व्यापक योगदान दिले. चोराखळीतील पापनाश मंदिर आजही त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा साक्षीदार आहे. त्यांच्या त्रिशताब्दी वर्षात या मंदिराचा सन्मान आणि परिसराची स्वच्छता राखणे हे आपले कर्तव्य आहे. या अभियानाच्या माध्यमातून संस्कार, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

## जिल्हा सामान्य रुग्णालयात जागतिक उच्च रक्तदाब दिन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** जिल्हा सामान्य रुग्णालयात असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जागतिक उच्च रक्तदाब दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके, डॉ. निखील भागवत उपस्थित होते.

यावेळी डॉ. चिंचोळे म्हणाले, उच्च रक्तदाब हा सर्वांसाठी हानिकारक आजार आहे. जास्त मीठ, चरबीयुक्त पदार्थ, आणि प्रक्रिया केलेले अन्न सेवन केल्याने तसेच मद्यपान, धुम्रपान तंबाखूयुक्त पदार्थाचे सेवन केल्याने उच्च रक्तदाब होतो. त्यामुळे ब्रेन स्ट्रोक, हार्ट अटॅक, किडनीचे आजार, पक्षाघात(लकवा) आणि डोळ्याचे आजार होऊन अंधत्व येऊ शकते व इतर गंभीर आजार होण्याची शकता जास्त असते, असे सांगितले.

प्रास्ताविक जिल्हा समन्वयक डॉ. पद्मजा बोरकर यांनी केले. संचालन समुपदेशक रामेश्वर बारसागडे यांनी तर आभार वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय राठोड यांनी मानले. कार्यक्रमाला जिल्हा तंबाखू नियंत्रण सल्लागार डॉ. श्वेता सावलीकर . अधिपरिचारीका माया आत्राम, पाठ्यनिर्देशिका प्रज्ञा अंबादे व किंवा कन्नाके, सुविधा काकडे, स्टॉफ नर्स प्राची काहिलकर तसेच रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी, नर्सिंग विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## भांडूप-गुहागर एसटी प्रवाशांना मनस्ताप; जुन्या गाड्यांना प्रवाशी वैंतागले

**अक्षराज : उदय दुणदणे**

**दि.२२, ठाणे :**



महाराष्ट्रातील अन्य डेपोत एसटीच्या नवनवीन गाड्या प्रवाशी जनतेच्या सेवेत येत असताना गुहागर डेपोला पाच नविन गाड्यांवर समाधान मानावे लागत आहे. याचा सर्वाधिक फटका लांब पल्ल्याच्या प्रवाशी जनतेला बसत आहे. ग्रामीण भागासह मुंबई, पुणे, मुंबई उपनगर ठाणे, नालासोपारा, विरार, डोंबिवली येथील प्रवाशांना अनेकदा प्रवासा दरम्यान मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. गळक्या एसटी बसेस, गाड्यांमध्ये अस्वच्छता,शिवाय अनेकदा रस्त्यात गाड्या बंद पडणे, वेळेमध्ये अनियमितता अशा कारणे प्रवाशांची नेहमीचीच ओरड असते. अशाच एका समस्येला भांडूप, ठाणे मार्गावरील प्रवाशांना सामोरे जावे लागले, बुधवार दिनांक २१ मे २०२५ रोजी मुंबई उपनगरातून भांडूप येथून रात्री ९ वा. सुटणारी भांडूप -गुहागर व्हाया ठाणे (खोपट ) गुहागर डेपोची असणारी गाडी नंबर (एम एच २० बी-२०-एल १५७४) सदर गाडीत मागच्या काही शीट प्रवाशांना बसण्यासाठी त्रासदायक ठरत आहेत, त्याचबरोबर गाडीच्या खिडक्या सहजरित्या मागे पुढे होत नसल्याने सद्या सुरू असलेल्या अवकाळी मुसळधार पावसाचे पाणी मागच्या काही खिडकीतून आत आल्याने मागच्या शिटवरील प्रवाशांना संपूर्ण रात्र भिजत प्रवास करावा लागल्याने प्रवाशांनामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

एकीकडे प्रशासन प्रवाशांच्या सेवेत अनेक सवलती योजनांचे तोरण बांधत आहे तर दुसरीकडे प्रवाशांच्या सेवेत समस्यांचे डोंगर उभे करून गुहागर प्रवाशी जनतेच्या सेवेत दुजाभाव करत असल्याचे वारंवार दिसून येते,गुहागर आगार प्रशासनाने किमान लांब पल्ल्याच्या बसेस तरी चांगल्या दर्जाच्या द्याव्यात अशी मागणी प्रवाशी जनतेकडून होत आहे.

## पारनेर तालुक्यात पायोनियर कंपनीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा

### * शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन...



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पायोनियर कंपनीच्या वतीने कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील वासुंदे, खडकवाडी, पिंपळगाव रोठा, नांदूर पठार, पाडळी, किन्ही, रायतळे, दैठणे गुंजाळ, सारोळा अटवाई, गोरेगाव, वाळवणे, पिंपरी गवळी, पानोली, कान्हूर, पळशी, वनकुटे, ढवळपूरी, करंडी, चिंचोली, पुनेवाडी आणि पिपळनेर या गावांमध्ये या कार्यशाळा यशस्वीपणे पार पडल्या.

या उपक्रमांतर्गत पायोनियर कंपनीचे अधिकारी रणवीर देशमुख, प्रवीण चौधरी, थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन बाजरी आणि मक्याच्या पिकांच्या पेरणीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत. या कार्यशाळांमध्ये पायोनियर 86M94 बाजरी आणि P3524 मका या उत्कृष्ट वाणांच्या पिकांची माहिती देण्यात आली. हे वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरत असून, त्यांच्या उत्पादनक्षमतेमुळे शेतकऱ्यांची पसंती मिळवत आहेत. कंपनीच्या तज्ज्ञांनी पेरणीची योग्य पद्धत, खत व्यवस्थापन, पाणी नियोजन आणि पीक संरक्षणाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतात मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे.या उपक्रमाचे तालुक्यातील प्रगतिशील शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे. खडकवाडी येथील बबन गागरे, वनकुटे येथील सुरेश डुकरे, वासुंदे येथील भास्कर झावरे, मच्छिंद्र वाबळे, पाडळी तर्फे कान्हूर येथील योगेश दावभट आणि पिंपळगाव रोठा येथील दत्तात्रय घुले यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्याचा हा उपक्रम शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पायोनियर कंपनीच्या या स्तुत्य प्रयत्नांमुळे तालुक्यातील शेतीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास आणि शेतीच्या आधुनिकीकरणास चालना मिळेल, असे शेतकऱ्यांचे मत आहे.

> पायोनियर कंपनीचे अधिकारी आमच्या बांधावर येऊन पेरणीची योग्य पद्धत आणि उत्कृष्ट वाणांची माहिती देत आहेत. यामुळे आमच्या शेतीला नवी दिशा मिळेल. उत्पादन वाढीसाठी मदत होणार आहे बाजरी व मका ही उत्तम प्रतीचं वाण आहे.
>
> **- मच्छिंद्र वाबळे (प्रगतिशील शेतकरी, वासुंदे)**

## विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना एल.एम.के.२०२५ चा पुरस्कार जाहीर

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२२, केज :** विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या केज तालुक्यासह जिल्ह्यातील मान्यवरांना एल.एम.के.२०२५ चा पुरस्कार जाहीर झाले असून दिनांक २५ मे २०२५ रोजी पुणे येथे भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, लेक माहेरचा कट्टा आयोजित एल.एम. के.२०२५ चा पुरस्कार मराठवाड्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या मान्यवरांना नुकतेच जाहीर झाले आहेत.

त्याच अनुषंगाने बीड जिल्ह्यासह केज तालुक्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत यामध्ये सामाजिक कार्यकर्ते विशाल ज्ञानोबा पांचाळ रा.डोका, जनहित न्यूजचे संपादक व ए.बी.न्यूजचे जिल्हा प्रतिनिधी वसंत रंगनाथ सोनवणे रा. येवता, आदर्श क्रांती मराठी न्यूज चे संपादक व दैनिक महावृत्त चे प्रतिनिधी तात्या गवळी रा. फुलेनगर केज, बीड न्यूज १ चे संपादक तथा प्रिंट मीडियाचे मुबाशीर मुमताजोदिन खतीब रा. रोजा मोहल्ला केज, टीव्ही ९ चे बीड जिल्हा प्रतिनिधी अशोकराव वसंत काळकुटे रा.येळंब घाट, सामाजिक कार्यकर्ते तथा आदर्श सरपंच गोरख भागोजी भांगे रा. डोका यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

दिनांक २५ मे २०२५ रोजी ठीक सकाळी ११-०० वाजता पिंपरी चिंचवड, पुणे येथे पुरस्कार सोहळ्यामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

सन २०१८ साली लेक माहेरचा कट्टाया ग्रुपच्या माध्यमातून लेक माहेरच्या कट्ट्याच्या संस्थापिका सौ. सारिकाताई प्रमोद ढाणे यांनी एकमेकींच्या सुख व दुःख हितगुज सखी सोबत वाटून घेऊया एकमेकींना साथ देऊया हे ब्रीदवाक्य घेऊन लेक माहेरचा कट्टा हा ग्रुप तयार करून साडेतीन लाख महिलांचे संघटन या ग्रुप द्वारे केले आहे. या ग्रुपच्या माध्यमातून संबंध राज्यभर विविध विषयावर लेक माहेरचा कट्टा हा ग्रुप काम करत आहे.

संस्थापिका सारिकाताई ढाणे यांनी ग्रुपच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील यशस्वी महिलांचे संघटन करून त्यांच्यातील सुप्त कला गुणांना वाव देणे, महिलांचे सर्वच क्षेत्रातील सक्षमीकरण करणे या उद्देशाने या ग्रुपची स्थापना केली.

आज रोजी त्यांचे रूपांतर एक दोन नव्हे तर तब्बल साडेतीन लाख महिलांचे त्यांनी मोठे संघटन आपल्या कर्तृत्व कौशल्यातून उभे केले आहे.

प्रत्येक वर्षी लेक माहेरचा कट्टाआयोजित एल.एम.के. गौरव पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून ग्रुपच्या वतीने सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, शासकीय सेवा, प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडियातील पत्रकार बांधवांसाठी ही विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला-पुरुष मान्यवरांचा लेक माहेरचा कट्टा च्या व्यासपीठावर त्यांना पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

दिनांक २५ मे २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यासाठी राज्यातील मान्यवरांची विविध पुरस्कारासाठी लेक माहेरचा कट्टासंस्थापिका सारिकाताई प्रमोद ढाणे यांनी निवड केली आहे.

## शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषी केंद्रातूनच, खत, बियाणे खरेदी करा

### * कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन *

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, मूल (चंद्रपूर) :** चालू वर्षातील २०२५-२६ खरीप पिकांसाठी तालुक्यातील समस्त शेतकऱ्यांनी खत, बियाणे, व कीटकनाशके खरेदी करताना फसवणूक होऊ नये यासाठी शासन मान्यता कृषी निविष्ठाचा विक्री परवाना असलेल्या कृषी केंद्रातूनच खरेदी करावे असे आवाहन कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी कारडवार यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

शेतकऱ्यांनी रासायनिक खते, बियाणे व कीटकनाशके खरेदी करताना अधिकृत व परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावी. यासाठी पक्क्या बिलाचाच आग्रह धरावा. विक्रेता पक्के बील देण्यास नकार देत असल्यास किंवा इतर कुठलीही शंका तक्रार असल्यास तालुका कृषी अधिकारी किंवा पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून तक्रार नोंदवावी. बिलांवर खरेदी केलेल्या बियाण्याच्या गुणवत्तेचा संपूर्ण तपशील नोंदविला आहे किंवा नाही याचा



खात्री करावी. खरेदी केलेल्या बियाणांचे पॉकीट सीलबंद, मोहरबंद तथा लेबलसह असल्याची खात्री करुन घ्यावी. बियाण्याच्या उगवण क्षमतेचा अंतिम मुदतीचा दिनांक पाहूनच पॉकीट किंवा बॅग खरेदी करावी. एम आरपी पेक्षा जास्त किंमतीने विक्री होत असल्यास त्वरीत कृषी विभागाकडे तक्रार नोंदवावी. रासायनिक खत खरेदी करताना बॅगवरील एमआरपी किंमत बघूनच खरेदी करावी. जर कोणताही व्यक्ती अथवा संस्था बेकायदेशीर पध्दतीने बोगस बियाण्यांची, खतांची विक्री करताना आढळल्यास त्याच्याविरुध्द बियाणे नियंत्रण आदेश १९८३ रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत तरतुदीप्रमाणे कारवाई केली जाईल.

अशी बोगस बियाणे व खते विक्रीची बाब शेतकऱ्यांच्या निदर्शनास आल्यास तात्काळ कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# बियाणांची उगवण क्षमता पाहूनच चाढ्यावर मुठ धरा

## मान्सून वेळेतच दाखल होण्याच्या सुवार्तेने बळीराजा सुखावला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** मान्सून अंदमानात दाखल होण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे. येत्या काही दिवसांत महाराष्ट्रात दाखल होणार असल्याने बळीराजा सुखावला असून हवामान विभागाच्या अंदाजानुसार या वर्षी मोसमी पाऊस एकूण सरासरीच्या १०० % पडणार असल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी मोसमी पाऊस लवकरच दाखल होणार असल्याने बळीराजा खरीप हंगामाच्या पूर्वतयारीला लागला आहे.

येत्या काही दिवसांत बाजारात खते व बियाणे विकत घेण्यासाठी कृषी सेवा केंद्रावर शेतकऱ्यांची लगबग दिसून येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी उगवण क्षमता पाहूनच पेरणीला सुरूवात करावी,असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

उत्पादनाच्या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामाच महत्त्वाचा असतो. हंगाम पूर्वीचे नियोजन हेच उत्पादन वाढीसाठी महत्त्वाचे ठरते त्यामुळे शेती मशागत, बिजोत्पादन तसेच बियाणांची उगवण क्षमता पाहूनच पेरणी केली तर पुढील संकट टळणार आहे. बियाणांसाठी शेतकऱ्यांनी व विविध कंपन्यांनी तयार केलेल्या प्लॉटची पाहाणी आता सुरू आहे. कृषी विज्ञान केंद्रत या प्लॉटची तपासणी केली जाते.

वातावरण आणि अनियमित पाऊस यामुळे प्लॉटवरील बियाणांच्या उगवण क्षमतेवर परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतेही बियाणे पेरणीपूर्वी त्याची उगवण क्षमता पाहणे गरजेचे आहे. पेरणीच्या तोंडावर विविध कंपन्यांचे बी - बियाणे बाजार येते. त्यामुळे दिशाभूल करून ते शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र त्याची उगवण क्षमता पाहूनच शेतकऱ्यांनी पेरणीचा निर्णय घ्यावा, असे आवाहन केले जात आहे. येथिल कृषी विज्ञान केंद्रात २ हजार ५०० हून अधिक नमुने तपासणीसाठी आले आहेत. त्यापैकी ३० ते ४० टक्के नमुने हे पेरणीयोग्य नसल्याचे सांगितले जात आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे. १०० मिमी पाऊस झाल्यानंतरच शेतकऱ्यांनी चाढ्यावर मूठ धरावी,असे आवाहन करण्यात आले आहे. उगवण क्षमता ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. बियाणे उगवणची खात्री केली तर दुबार पेरणी, तक्रारी या समस्या उद्भवणारच नाहीत. बियाणे उगवले नाही, अशी तक्रार करण्यापेक्षा पेरणीपूर्व काळजी घेतली तर शेतकऱ्यांसाठी फायद्याचे होणार आहे. असे विभागीय कृषी अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# भाळवणी विविध कार्यकारी सेवा सोसायटीची जिल्हा लेखा परीक्षक मार्फत लेखापरीक्षण व्हावे

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्यावतीने सहकार आयुक्त कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील भाळवणी येथिल विविध कार्यकारी सेवा सोसायटी मार्फत सहकार अधिनियमाच्या नियमबाह्य कर्ज वाटप केल्याने संस्थेचे जिल्हा लेखा परीक्षक वर्ग एक मार्फत लेखापरीक्षण व वैधानिक तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

यामध्ये दोषी चेअरमन, संचालक व सचिव यांच्यावर सहकार अधिनियमानुसार गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणी एक महिन्यात कारवाई न झाल्यास सहकार आयुक्त कार्यालय (पुणे) समोर उपोषण करण्याचा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

भाळवणी विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सचिव, संचालक मंडळ यांनी जिल्हा बँक शाखा भाळवणी व्यवस्थापक व विकास संस्थेचे ऑडिट यांच्या संगणमताने केले आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या ठेविदार व सभासदांची फसवणूक करून वरून सदर व्यक्तींनी भाळवणी विकास संस्थेमार्फत कोर्टाचे व इतर संस्थेचे जप्ती आदेश असतानाही बेकायदेशीरपणे आदेशाला केराची टोपली दाखवून चुकीच्या पद्धतीने बेकायदेशीर कर्ज वाटप करण्यात आले आहे. बँकेच्या व संस्थेच्या ठेकेदार व सभासदांची फसवणूक केली आहे. तसेच इतर कर्जासह पशुपालन कर्जामध्ये शंभर टक्के घोटाळा करून सदर व्यक्तींनी संचालक व कर्मचारी यांनी अफरातफर केली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जप्तीचे व कोर्टाचे मनाई आदेश असताना देखील कर्ज वाटप करण्यात आले आहे. हा आदेश झुगारून त्याची पायमल्ली करण्यात आली आहे. सन २०१९ पासून आजतागायत या गटावर बेकायदेशीर रित्या संचालक मंडळ, सचिव, जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक, ऑडिटर यांच्या संगनमताने ठेवीदार सभासदांची व कर्जदार सभासदांची वारंवार फसवणूक करून सदर लोकांनी स्वतःच्या हितासाठी संस्थेची फसवणूक केली असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

सदरील अधिकारी व संचालक मंडळावर कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करावे, यामुळे ठेविदार सभासद यांना न्याय मिळणार आहे. या प्रकरणाचा भंडाफोड होण्यासाठी भाळवणी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे जिल्हा लेखा परीक्षक वर्ग एक मार्फत लेखापरीक्षण व वैधानिक तपासणी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

# वीज पडण्याची पूर्वसूचना देणारे 'दामिनी' ॲप वापरा - तहसीलदार नाईकवाडे

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२२, विंचूर (नाशिक) :** निफाड येथील तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी पावसाळ्यात वीज पडल्यावर नागरिकांनी सावधानगिरी कशी करावी. त्यासाठी त्यांनी 'दामिनी' हे ॲप कसे वापराल. भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाअंतर्गत विकसित करण्यात आले ॲप असून, जीपीएसच्या आधारे तुमच्या परिसरात वीज पडण्याचा धोका असल्यास सूचना पाठवते. या ॲपमुळे शेतकरी, कामगार, विद्यार्थी, तसेच ग्रामीण भागातील नागरिक सुरक्षित स्थळी वेळेवर जाऊ शकतात. नैसर्गिक आपत्तींपासून नागरिकांचे प्राण आणि मालमत्ता वाचवण्यासाठी दक्ष राहणे गरजेचे आहे. वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये नागरिकांचा होणारा बळी टाळण्यासाठी 'दामिनी' हे ॲप उपयुक्त ठरत असून, प्रत्येक नागरिकाने ते आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करावे, असे आवाहन निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे. ते म्हणाले की, हवामान बदलाचे परिणाम आता अधिक तीव्र स्वरूपात जाणवू लागले आहेत. विशेषतः वीज कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून ग्रामीण भागात त्याचे प्रमाण अधिक आहे.अशा परिस्थितीत 'दामिनी' ॲप वीज कोसळण्यापूर्वी २० ते ३० मिनिटांची पूर्वसूचना देत असल्याने जीव वाचवण्यास मदत होते.तहसीलदार नाईकवाडे यांनी गावपातळीवर ग्राम सेवक,आशा वर्कर,अंगणवाडी सेविका, शिक्षक आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांना 'दामिनी' ॲपच्या जनजागृतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.



### दामिनी ॲप कसे वापराल?

गुगल प्ले स्टोअरवरं "Damini: Lightning Alert' टाइप करून ॲप डाऊनलोड करा. ॲपला लोकेशनची परवानगी द्या. तुमच्या परिसरातील वीज कोसळण्याची शक्यता असल्यास ॲप नोटिफिकेशन पाठवेल. शक्य तितक्या लवकर सुरक्षित ठिकाणी जावे आणि धातूच्या वस्तूंपासून दूर राहावे.

नागरिकांनी या ॲपचा लाभ घ्यावा आणि वीज कोसळण्याच्या धोक्यापासून स्वतःसह इतरांचाही जीव वाचवावा, असे आवाहन निफाड तहसील प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# कोकणातील चाकरमान्यांसाठी फडणवीस सरकारची मोठा निर्णय

## मुंबईतून मालवणात पोहचणार अवघ्या ४ तासात

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२२, मुंबई :** गौरी गणपतीत आणी शिमग्याला कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी खुशखबर हाती आली आहे. गणपतीत आता समुद्र मार्गे प्रवास करता येणार आहे. चाकरमान्यांना कमी वेळेत गावी पोहोचवण्यासाठी मत्स्य व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी पुढाकार घेतला आहे.



फडणवीस सरकारच्या निर्णयामुळे साडेचार तासांत मालवण, विजयदुर्ग तर तीन तासांत रत्नागिरी गाठता येणार आहे. आता मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरू होणार आहे.

जलवाहतूक सेवा सुरू झाल्याने चाकरमानी कमी वेळेत कोकणात पोहोचणार आहेत. हायटेक यंत्रणा असलेल्या एम टू एम या बोटीमार्फत कोकणात प्रवास करणार आहेत. फडणवीस सरकारच्या निर्णयामुळे चाकरमान्यांचा मोठा त्रास कमी होणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा महत्वाचा निर्णय मानला जात आहे.

### चाकरमान्यांचा त्रास कमी होणार

गणेशोत्सवात कोकणात जाताना चाकरमान्यांना रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडीने होणारी परवड आणि वेळखाऊ प्रवासाचा त्रास चाकरमान्यांसाठी नेहमीचाच झाला आहे. या त्रासातून दिलासा देण्यासाठी मत्स्य व बंदरे विभागाकडून मुंबईतील माझगावपासून मालवण, विजयदुर्ग, रत्नागिरीपर्यंत जलवाहतूक सेवा सुरू करण्यात येणार आहे.

जलवाहतूक सेवेसाठी एम टू एम बोट वापरली जाणार आहे. येत्या २५ मे रोजी ती मुंबईतील भाऊचा धक्का येथे दाखल होणार आहे. फडणवीस सरकारमधील मंत्री नितेश राणेंच्या संकल्पनेतून परवडणाऱ्या दरात जलवाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे. याकरिता एम टू एम ही बोट सेवा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याचे प्रयोजन आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हायटेक यंत्रणा असलेल्या एम टू एम या बोटीमार्फत पुन्हा एकदा जलवाहतूक सुरू करण्याचा प्रयत्न आहे. मुंबईतील माझगाव डॉक येथून प्रवास सुरू होईल. जवळपास साडेचार तासांत कोकणातील मालवण, विजयदुर्ग तर तीन तासांत रत्नागिरीपर्यंत पोहोचता येईल. लवकरच चाकरमान्यांना परवडतील, असे दर यासाठी निश्चित केले जाणार आहे.

# थोडक्यात

## पंढरपूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे १३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

### आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा पिकांचे नुकसान


**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.२२, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यात दिनांक १३ ते २१ मे दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे १५४ शेतकऱ्यांचे नजर अंदाज ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये आंबा, केळी, डाळींब, कांदा, शेवगा आदी पिकांचा समावेश आहे. तसेच एकलासपुर येथे तीन घरांची पडझड झाली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. तालुक्यात दिनांक १३, १५ व १९ मे २०२५ रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील तावशी, तुंगत, बाभुळगाव, आढीव, रोपळे, शेटफळ, खेडभाळवणी, गादेगाव, शिरगाव, कोर्टी, बोहाळी आदी गावांतील १५४ शेतकऱ्यांचे ९३.३७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच अवकाळी पाऊस व वादळी वा-यामुळे एकलासपुर येथील ३ घरांची पडझड होवून नुकसान झाले असून शिरगाव येथे अंगावर झाड पडून १ गाय मयत झाली आहे. याबाबतचे पंचनामे करण्याचे कामकाज सुरु असल्याची माहिती तहसिलदार लंगुटे यांनी दिली. तसेच दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वा-यांमुळे होणा-या नुकसानीबाबतचे पंचनामे करुन दिनांक ०१ जून २०२५ पर्यंत कृषीसहाय्यक, ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश तहसिल कार्यालयाकडून देण्यात आले असून तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबतचा एकत्रित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयमार्फत शासनास सादर करण्यात येईल. असे ही तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगितले.

## रस्त्यांवरील अनधिकृत हातगाड्यांविरोधात ठाणे महानगरपालिकेच्या निष्क्रियतेचा निषेध

**अक्षराज : विनोद वास्कर**


श्री. रोहिदास बामा मुंडे
शिवसेना
rohimunde@gmail.com

**दि.२२, दिवा (ठाणे) :** दिवा विभागातील नागरिकांच्या वारंवार तक्रारी असून ही ठाणे महानगरपालिका रस्त्यांवरील अनधिकृत हातगाड्यांविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई करत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या हातगाड्यांमुळे सार्वजनिक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण होत असून शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव धोक्यात घालून वाहतूक पार करावी लागत आहे. ही परिस्थिती भारताच्या संविधानातील अनुच्छेद २१ (जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क) आणि अनुच्छेद १९(१)(व) (मुक्तपणे वावरण्याचा हक्क) यांचे सरळ उल्लंघन आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४४ व २४५ नुसार सार्वजनिक रस्ते मोकळे ठेवणे आणि अतिक्रमण हटवणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. पण तरीही महानगरपालिका या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत आहे. या संदर्भात आयुक्तांना निवेदन दिले असून ७ दिवसांच्या आत कारवाई न झाल्यास मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका (PIL) दाखल करण्यात येईल, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांच्याकडून देण्यात आला आहे. दिवा विभागातील नागरिक आता न्यायासाठी संघटित होत असून, महानगरपालिकेच्या प्रशासनाला जर वेळेत जाग न आली, तर याचे पडसाद संपूर्ण ठाणे शहरात उमटतील असे रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

## तीन दिवस नाल्यातून काढलेला कचरा, गाळ तसाच...

### प्रशासन आता तरी लक्ष देणार का?

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.२२, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात पावसाळा पुर्व नालेसफाईला सुरुवात करण्यात आली असून अतिवृष्टीत नाले तुंबून आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये. यासाठी ठाणे महापालिकेकडून दिवा शहरात नालेसफाईची कामे चालू आहेत. दिवा सर्कल भागातील नाल्यांमधून देखील मोठ्या प्रमाणावर कचरा व गाळ काढण्यात येत आहे. याशिवाय नाल्यातून काढलेला कचरा ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त नागरगोजे यांनी तात्काळ हटविण्याचे आदेश दिले आहेत. परंतु आज तीन दिवस झाले तरीसुद्धा कचरा आणि गाळ तिथेच पडून आहे. आता तरी प्रशासन याकडे लक्ष देणार का? कचरा आणि गाळ तिथेच पडून असल्यामुळे नागरिकांना चिखलातूनच वाट काढावी लागत आहे. तसेच दुर्गंधीचा ही सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे याकडे ठाणे महानगरपालिकेने लक्ष द्यावे. अशी दिव्यातील नागरिकांची मागणी आहे. तसेच रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्याचे काम चालू आहे. नवीन नाल्यांचे काम सुद्धा चालू असल्यामुळे रस्त्याच्या दोन्ही कडेला चिखल असल्यामुळे नागरिकांची चांगलीच फजिती झाली आहे. रस्त्यात चालाचे कसे हा प्रश्न दिव्यातील नागरिकांना पडलेला आहे.

## रेनोवेट इंडियाचा १०वा वर्धापन दिन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, मुंबई :** दिनांक २४ मे २०२५ रोजी गेली १० वर्षे समाजातील सकारात्मक समाज बदलासाठी कार्यरत असलेली अग्रगण्य संस्था रेनोवेट इंडिया यंदा आपला दहावा वर्धापन दिन साजरा करत आहे. या खास प्रसंगी महाराष्ट्रातील तळागाळातील सामाजिक संस्थांना एकत्र येण्यासाठी विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. हा कार्यक्रम २४ मे २०२५ रोजी, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह, भायखळा (पूर्व), मुंबई येथे दुपारी ३ वाजता ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि विचारांची देवाणघेवाण होणार आहे. कार्यक्रमात रेनोवेट इंडियाचा १० वर्षांचा प्रवास, त्यांच्या यशोगाथा, अनुभवलेले क्षण आणि भविष्यातील दिशा यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील प्रेरणादायी ग्रासरूट्स संस्थांशी थेट संवाद, नव्या भागीदारीच्या संधी, तसेच नेटवर्किंग व चहा-नाश्त्याची मेजवानी यांची ही व्यवस्था करण्यात आली आहे. हा कार्यक्रम म्हणजे राज्यातील विविध भागांतील कार्यकर्त्यांना एकत्र येऊन अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी आहे. यामुळे नव्या संकल्पना रुजतील, भागीदारी वाढेल आणि सकारात्मक समाज परिवर्तनासाठी प्रभावी पावले उचलली जातील.